दैनिक **महावृत्त**

E-Mail:dainikmhavratt@gmail.com

संपादक-अशोक हनवते.मो-9421094991,7264079990

लातूर | वर्ष ४ थे | अंक ७६ वा | गुरूवार दि.२२ ऑगस्ट २०२४ | पृष्ठे ४ | स्वागत मूल्य २ रू.

# विद्यार्थ्यांच्या सुरक्षेला सर्वोच्च प्राधान्य; सर्व शाळांना सीसीटीव्ही बसविणे बंधनकारक

मुंबई : बदलापूर येथील शाळेत दोन चिमुकल्यांवरील अत्याचाराची घटना उघडकीस आल्यानंतर शालेय शिक्षण विभागाने विद्यार्थ्यांच्या सुरक्षेला सर्वोच्च प्राधान्य देत कठोर पावले उचलली आहेत. त्यानुसार सर्व खासगी व्यवस्थापनासह सरकारी शाळांना सीसीटीव्ही कॅमेरे बसविणे बंधनकारक करतानाच त्याचे फुटेज तपासणी अनिवार्य करण्यात आले आहे. यासोबतच कंत्राटी कर्मचाऱ्यांची नियुक्ती करताना संबंधितांच्या पार्श्वभूमीची काटेकोर तपासणी करण्याचे निर्देशही विभागाने दिले आहेत. विद्यार्थ्यांच्या सुरक्षेसाठीच्या उपाययोजनांच्या आढाव्यासाठी राज्यस्तरीय समितीही स्थापन करण्यात आली असून या समितीला तीन महिन्यांनी आढावा घेणे बंधनकारक करण्यात आले आहे.

बदलापूर येथील शाळेतील घटना उघडकीस आल्यानंतर निर्माण झालेल्या तीव्र जनक्षोभाची दखल घेत शालेय शिक्षण विभागाने बुधवारी विद्यार्थ्यांच्या सुरक्षाविषयक उपाययोजनांबत शासन निर्णय जारी केला. त्यानुसार खासगी शाळांमध्येही सीसीटीव्ही बंधनकारक करण्यात आले आहे. सर्व शाळांनी महिनाभरात महत्त्वाच्या ठिकाणी कॅमेरे बसवावेत. यात कुचराई केल्यास अनुदान रोखण्याचा किंवा शाळेची मान्यता रद्द करण्याचा इशारा विभागाने दिला आहे. तसेच, या सीसीटीव्ही फुटेजची ठराविक अंतराने नियमित पाहणी करण्याची जबाबदारी शाळेचे मुख्याध्यापक आणि शाळा व्यवस्थापन समितीवर सोपविण्यात आली आहे. आठवड्यातून किमान तीनवेळा सीसीटीव्ही फुटेजची तपासणी करावी. या तपासणीत काही आक्षेपार्ह आढळल्यास स्थानिक पोलिस प्रशासनाशी संपर्क साधून कार्यवाही करण्याची जबाबदारीही मुख्याध्यापकांची असणार आहे.

बदलापूरच्या घटनेतून धडा घेत शिक्षकेतर कर्मचाऱ्यांची नियुक्ती करताना काळजी घ्यावी. कर्मचाऱ्यांच्या वर्तनावर नियंत्रण ठेवण्याच्या उपाययोजना कराव्यात. सुरक्षा रक्षक, सफाईगार, मदतनीस, स्कूलबस चालक इत्यादींच्या नियुक्तीत संबंधितांच्या पार्श्वभूमीची शाळा व्यवस्थापनाने काटेकोर तपासणी करावी. तसेच, नेमणुकीपूर्वी पोलिसांकडून चारित्र्य पडताळणी अहवाल मिळवणे बंधनकारक करण्यात आले आहे. कंत्राटी शिक्षकेतर कर्मचाऱ्यांची नियुक्ती करताना सहा वर्षांपर्यंतच्या विद्यार्थ्यांसाठी प्राधान्याने महिला कर्मचाऱ्यांची नियुक्ती करण्याच्या सूचना या शासन निर्णयात करण्यात आल्या आहेत. यासोबतच सर्व शाळांना तक्रार पेटी बसविणे बंधनकारक असणार आहे. तक्रार पेटीसाठी मुख्याध्यापकांना व्यक्तिशः जबाबदार धरण्यात आले आहे. यात कसूर झाल्यास शिस्तभंगाची कारवाई करण्याचा इशारा विभागाने दिला आहे. शिवाय, सखी सावित्री समितीच्या तरतुदींचे पालन करण्याच्या सूचनाही करण्यात आल्या आहेत.

विद्यार्थी सुरक्षा समिती स्थापन होणार

प्रत्येक शाळेत लैंगिक छळाच्या तक्रारींसाठी विशाखा समितीच्या धर्तीवर आठवडाभरात विद्यार्थी सुरक्षा समिती गठित कराव्यात. शिक्षणाधिकारी स्तरावरून या समित्या स्थापन करण्याची कारवाईचे निर्देश देण्यात आले आहेत. शिवाय, या सर्व उपाययोजनांचा नियमित आढावा घेण्यासाठी राज्यस्तरीय विद्यार्थी सुरक्षा आढावा समिती गठित करण्यात आली आहे. शिक्षण आयुक्तांच्या अध्यक्षतेखाली ही समिती काम करेल. स्थानिक पातळीवर गट शिक्षणाधिकाऱ्यांनी महिन्यातून एकदा आणि दोन महिन्यातून शिक्षणाधिकाऱ्यांनी उपाययोजनांचा आढावा घ्यावा. तसेच या राज्यस्तरीय समितीने तीन महिन्यातून एकदा शैक्षणिक विभागनिहाय आढावा

# उपमुख्यमंत्री अजित पवार यांचे लातूर विमानतळावर स्वागत; महिलांनी राखी बांधून दिल्या शुभेच्छा





लातूर, दि. २१ : उपमुख्यमंत्री अजित पवार यांचे परळी वैजनाथ येथील राज्यस्तरीय कृषि महोत्सवाला उपस्थित राहण्यासाठी लातूर विमानतळावर आगमन झाले. जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर-घुगे यांनी यावेळी त्यांचे स्वागत केले. तसेच यावेळी उपस्थित महिलांनी उपमुख्यमंत्री श्री. पवार यांना राखी बांधून शुभेच्छा दिल्या.

आमदार विक्रम काळे, जिल्हा पोलीस अधीक्षक सोमय मुंडे, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी अनमोल सागर, लातूरच्या उपविभागीय अधिकारी रोहिणी नऱ्हे- विरोळे यावेळी उपस्थित होत्या.

# उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे लातूर विमानतळावर स्वागत

लातूर, दि. २१ : उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर-घुगे यांनी लातूर विमानतळावर स्वागत केले. परळी वैजनाथ येथील राज्यस्तरीय कृषि महोत्सवाला उपस्थित राहण्यासाठी त्यांचे लातूर विमानतळावर आगमन झाले होते. आमदार पंकजा मुंडे त्यांच्या सोबत



होत्या. नांदेड परिक्षेत्राचे विशेष पोलिस उपमहानिरीक्षक शहाजी उमाप, पोलीस अधीक्षक सोमय मुंडे, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी अनमोल सागर, लातूर शहर महानगरपालिका आयुक्त बाबासाहेब मनोहरे यावेळी उपस्थित होते.

# ग्रामीण भागातील समस्या चित्रपटातून मांडल्या गेल्या पाहिजे..! अनिल कुमार गायकवाड यांचे उद्गार...

## के. रवि (दादा) यांच्या रक्षणबंधन लघुपटाचा शुभारंभ





मुंबई/प्रतिनिधी के. रवि (दादा) :- ग्रामीण भागातील समस्या या सध्याच्या प्रभावी ठरणाऱ्या सोशल मीडिया वरून प्रसारित होऊन त्यांना न्याय मिळाला पाहिजे, असे उद्गार मुंबई महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ उपाध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक अनिल कुमार गायकवाड यांनी येथे बोलताना काढले. माहीम येथे रक्षणबंधन लघुपटाचे उद्घघाटन गायकवाड यांच्या शुभ हस्ते झाले. त्यावेळी ते बोलत होते. यावेळी फिल्म क्षेत्रातील अनेक मान्यवर उपस्थित होते.

आदिवासी ग्रामीण भागातील विविध प्रश्न मोठ्या प्रमाणात आहेत. ही बाब अत्यंत चिंतेची आहे त्याची सोडवणूक सरकार बरोबरच समाजसेवी संस्थांनी केली पाहिजे, त्यासाठी माझ्या नावाने ही एक सामाजिक संस्था महाराष्ट्रभर विविध उपक्रम राबवत आहे. शिक्षण आरोग्य पर्यावरण अशा पाच सूत्री कार्यक्रमावर या संस्थेचा भर आहे. पर्यावरण म्हणून संपूर्ण महाराष्ट्रभर प्रत्येक जिल्ह्यातील दहा गावांमध्ये वृक्ष वाटप करून त्यांचे संगोपन करणाऱ्या कुटुंबाला सन्मानित करून विशेषतः महिलांना साडीचोळी दिली जाईल, असा आपण सामाजिक उपक्रम राबवत असल्याचे अनिलकुमार गायकवाड यांनी सांगितले. भविष्यात राजकारणात जायचे की नाही? हे अद्याप ठरलेले नाही, पण चित्रपट क्षेत्रात एखादी भूमिका करण्यास आवडेल, असेही त्यांनी बोलताना स्पष्ट केले. यावेळी रक्षणबंधन चित्रपटाचे निर्माता व ज्येष्ठ समाजसेवक के रवी दादा यांनी यावेळी रक्षणबंधन लघुपटतून सामाजिक संदेश कसा दिला जाईल, याबाबत सविस्तर माहिती दिली. या चित्रपटातून सामाजिक संदेश दिला जाणार आहेच, परंतु सामाजिक संघटनानी आदिवासी पाड्यातील गोरगरिबांना त्यांच्या विकासासाठी सीएसआर फंडाचा योग्य वापर करावा, तसेच भारताच्या राष्ट्रपती द्रोपदी मूर्म यांनी आदिवासी विकासासाठी ठोस योजना राबवली पाहिजे, अशी अपेक्षा निर्माता समाजसेवक के रवी दादा यांनी बोलताना व्यक्त केली. यावेळी श्री कडतोबा मुव्हीजचे निर्माता दिग्दर्शक के. रवी. दादा, बालकलाकार मनस्वी गायकवाड, रोशनी दुपारगुडे, राजश्री शेंडे, शरद रणपिसे, महादू पवार, राजेश वाळुंज, नईम शेख, माजी पोलीस अधिकारी समाजसेवक : अरविंद पटकुरे, डीआरआयचे माजी संचालक : नारायण जाधव, डॉ. रतन पवार, दीपक पडये, रमजान सिद्दिकी आदी उपस्थित होते.



मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचे जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर-घुगे यांनी लातूर विमानतळावर स्वागत केले. परळी वैजनाथ येथील राज्यस्तरीय कृषि महोत्सवाला उपस्थित राहण्यासाठी त्यांचे लातूर विमानतळावर आगमन झाले होते. नांदेड परिक्षेत्राचे विशेष पोलिस उपमहानिरीक्षक शहाजी उमाप, पोलीस अधीक्षक सोमय मुंडे, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी अनमोल सागर, लातूर शहर महानगरपालिका आयुक्त बाबासाहेब मनोहरे यावेळी उपस्थित होते.

# पंकजाताई मुंडे यांना पत्रकारांचा प्रश्न ?

## मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण, नंतर पत्रकार माझा लाडका भाऊ ही पण योजना महाराष्ट्र सरकारणे सुरू करावी..?

> पत्रकार संवाद यात्रा समारोप दरम्यान पत्रकारांच्या प्रश्नाला उत्तर देताना लोकनेत्या : पंकजाताई मुंडे म्हणाल्या की, मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण हि योजना एवढी लोकप्रिय झाल्या नंतर आनेक योजना पुढे येत आहेत तशीच योजना पत्रकार माझा लाडका भाऊ किवा पत्रकार माझा सहकारी हि योजना सुरू करायला काही हरकत नाही पण बाकी पत्रकारावर पण अन्याय होता कामा नये, म्हणून पत्रकार कसा असावा ? तर तो निर्भिड आणि दबंक असावा, आसे काहीतरी नक्कीच करू..!
> पंकजाताई मुंढे







मुंबई प्रतिनिधी/के.एच. हनवते :- महाराष्ट्रच नाहीतर सबंध भारताची क्रांतीभुमी दीक्षाभूमी ते मंत्रालय पत्रकार संवाद यात्रेचा समारोप मुंबई येथील यशवंतराव चव्हाण सभागृहात पार पडला. त्यावेळी या कार्यक्रमास संबोधीत करताना पंकजाताई मुंडे यांना पत्रकारांनी जाहीर प्रश्न केला की, महाराष्ट्र सरकारणे मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण हि योजना सुरू केली तसेच पत्रकार माझा लाडका भाऊ किंवा पत्रकार माझा सहकारी हि पण योजना महाराष्ट्र सरकारणे सुरू करावी यासंदर्भात प्रती उत्तर देताना पंकजाताई मुंडे यांनी वरिल उदगार काढून पत्रकारांच्या प्रश्नाला सडेतोड उत्तर दिले. लोकशाईचा चौथा स्तंभ वृत्तपत्र/पत्रकार संवाद यात्रा दीक्षाभूमीवरून सुरू झाली ति संवाद यात्रा महाराष्ट्राची राजधानी मुंबई मंत्रालय येथे २० आगस्ट २०२४ रोजी दाखल झाली या संवाद यात्रेचा समारोप यशवंतराव चव्हाण सेंटर मुंबई येथे संपन्न झाला या भरगच्च कार्यक्रमास महाराष्ट्र सरकार मंत्रालय प्रतिनिधी म्हणून मा. मंगल प्रभा लोंढा, मा. चंद्रकांत पाटील, मा. संजय भोकरे, आयु. पंकजाताई मुंडे यांनी उपस्थित राहून पत्रकारांच्या विविध मागण्या समजुन घेतल्या व या संदर्भात येत्या आठ दिवसांत महाराष्ट्राचे मुख्यमंत्री / उपमुख्यमंत्री यांच्यासमोर हा प्रस्ताव ठेवून पत्रकारांच्या विविध विषयावर चर्चा करून योग्य तो निर्णय घेऊन पत्रकारांना नक्कीच न्याय मिळवून देण्यासाठी सरकार कटीबद्ध आहे आसे अश्वासन दिले. नागपूरच्या दीक्षाभूमीला अभिवादन करून दिनांक : २८ जुलै २०२४ पासून महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ महाराष्ट्र प्रदेशाध्यक्ष : वसंत मुंडे यांच्या नेतृत्वाखाली हि सुरु झालेली पत्रकार संवाद यात्रेचा समारोप मुंबई येथे दिनांक : २० ऑगस्ट २०२४ रोजी करण्यात अला. संपूर्ण महाराष्ट्रातील पत्रकारांच्या विविध समस्या व न्याय हक्कासाठी मंत्रालयांमध्ये साकडे घालून केली. प्रदेशाध्यक्ष वसंत मुंडे, सरचिटणीस विश्वास आरोटे, राज्य संघटक संजय भोकरे, प्रदेश उपाध्यक्ष नितीन शिंदे, प्रदेश कार्याध्यक्ष प्रवीण सपकाळे, राज्य समन्वयक संतोष मानुरकर यांनी लोकशाहीत वृत्तपत्र आणि पत्रकार हा चौथा स्तंभ मानला जातो. मात्र अलीकडे वाढती महागाई आणि समाजमाध्यमांचा वापर कमी झाल्यामुळे पत्रकारांसमोर अनेक अडचणी निर्माण होत आहेत. महाराष्ट्र राज्य पत्रकार संघटनेत विविध माध्यमात काम करणारे ३० हजार पेक्षा अधिक सदस्य असल्याने पत्रकारांच्या मागण्यांकडे सरकारचे लक्ष जावे आणि समाजाचाही पाठींबा मिळावा, यासाठी महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाच्या शेकडो पत्रकारांनी दिक्षाभूमी ते मंत्रालय अशी पत्रकार संवाद यात्रा काढण्याचा निर्णय घेतला हि संवाद यात्रा प्रदेशाध्यक्ष : वसंत मुंडे यांच्या नेतृत्वाखाली आधुनिक भारताचे संविधान निर्माते - घटनाकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पवित्र दिक्षाभूमीला वंदन करून नागपूर येथून यात्रेला सुरूवात झाली प्रत्येक जिल्ह्यात स्थानिक पत्रकार, समाजातील विविध घटकांशी संवाद करत या यात्रेचा समारोप मुंबई येथे यशवंतराव चव्हाण सभागृहात २० आगस्ट रोजी संपन्न झाला. राज्याचे प्रमुख म्हणून आपण राज्यातील पत्रकारांच्या मागण्यांना न्याय द्यावा, अशी विनंती महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ, मुंबई मार्फत महाराष्ट्राचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांच्याकडे करण्यात आली. संपूर्ण महाराष्ट्रातून हजारोंच्या संख्येत पत्रकार उपस्थित होते.

दैनिक महावृत्त पहा ऑनलाईन कोठेही mhavratt.com या वेबसाईटवर पाहता येणार

# बदलापूर स्थानकातला उद्रेक काय सांगतो?

बदलापूरमधील शाळेत तीन-चार वर्षांच्या दोन मुलींवर झालेला लैंगिक अत्याचार या समाजाची मानसिकता दर्शवतो. शाळेच्या स्वच्छतागृहात एका कर्मचाऱ्याने केलेल्या या कृत्याचा निषेध करण्यासाठी बदलापूर रेल्वे स्थानकात नागरिकांनी तीव्र आंदोलन करणे, हीसुद्धा स्वाभाविक प्रतिक्रिया. इतक्या लहान वयातील मुलींवर शाळेच्या आवारात असे अत्याचार होत असतील, तर हतबल असलेल्या पालकांसमोर तातडीचा अन्य पर्यायही असत नाही. संतापाचा असा तीव्र उद्रेक ही समाजभावना जागृत असल्याचीच खूण म्हटली पाहिजे. ज्या समाजात मुलींवर इतक्या लहान वयातच अत्याचार होतात, तो समाज सांस्कृतिकदृष्ट्या किती पोखरलेला आहे, हेही या आणि अशा घटनांमुळे पुन्हा पुन्हा लक्षात येते. अशा अत्याचाराची जबाबदारी कुणाची हा मुद्दा या आंदोलनाच्या निमित्ताने पुन्हा ऐरणीवर आला. ज्या महाराष्ट्रात मुलींच्या शिक्षणाची मुहूर्तमेढ रोवली गेली आणि त्याचा परिणाम म्हणून गेल्या पावणेदोनशे वर्षांत या राज्याने सामाजिक सुधारणांच्या क्षेत्रात नेतृत्व केले, त्याच महाराष्ट्रात शिकण्यासाठी शाळेत गेलेल्या मुलींवर असे अत्याचार होणे, हे दुर्दैवीच.



अशा अत्याचारांना बळी पडणाऱ्या या देशातील सामान्यांना कुणीच वाली नाही, अशी समाजभावना निर्माण होणे हे काळजी वाढवणारे आहे. ही घटना घडली १८ ऑगस्टला. त्यानंतरच्या काळात पोलिसांकडून तातडीने कारवाई झाली नाही, शाळेनेही पुढाकार घेऊन कोणत्याही प्रकारे समंजस भूमिका बजावली नाही, असे आंदोलकांचे म्हणणे. मुले शाळेत जातात, तेव्हा त्यांची संपूर्ण जबाबदारी शाळेने घ्यायला हवी, असे पालकांचे म्हणणे असते. गेल्या काही दशकांत बदलत गेलेल्या सामाजिक परिस्थितीत एकत्र कुटुंब व्यवस्था विस्कळीत होत गेली. शहरात कामधंद्यासाठी आलेल्या चाकरमान्यांना आपले घरदार चालवण्यासाठी जी धडपड करावी लागते, ती त्यांच्या जगण्याचीच परीक्षा असते. आपल्या मुलामुलींना उत्तम शिक्षण मिळावे, त्यांनी शिकून मोठे व्हावे, या किमान अपेक्षा बाळगत पालक मुलांना शाळेत जायला भाग पाडतात. कुटुंब छोटे होत गेल्यामुळे आई-वडिलांना घराबाहेर पडून पैसे मिळवण्याशिवाय पर्याय नसतो. पाल्याला शाळेत घातले की त्याची जबाबदारी शाळेने घ्यावी, अशी पालकांची स्वाभाविक अपेक्षा असते.

मात्र आपली मुले शाळेत सुरक्षित असतील, या विश्वासावर पालकांनी निर्धास्त राहणे, यापुढील काळात उपयोगाचे नाही. गेल्या काही दशकांत शिक्षणाची बाजारपेठ झाली आणि त्याचे व्यवसायात रूपांतर झाले. सोयीसुविधांचे अमिष दाखवून पालकांना आकृष्ट करण्याची अटीतटीची स्पर्धा सुरू झाली. या स्पर्धेचे बळी ठरलेल्या पालकांनी आता कशावरही विसंबून राहण्यासारखी परिस्थिती राहिलेली नाही, असे या प्रकारच्या घटनांवरून स्पष्ट होते आहे. पालकांनी मुलांवर, त्याच्या शिक्षणावर काळजीपोटी लक्ष देणे ही आता काळाची गरज आहे. मुले शाळेत गेली, म्हणजे आपली जबाबदारी संपली, ही काही दशकापूर्वीची परिस्थिती आता राहिलेली नाही, हे अशा घटनांमुळे पुन्हा पुन्हा लक्षात येऊ लागले आहे. शिक्षणात आपल्या पाल्याची प्रगती नेमकी काय आहे, त्याच्यावर कोणते संस्कार होत आहेत, मुलांचे मित्र मैत्रिणी कोण आहेत, घरातले वातावरण कसे आहे अशा अनेक गुंतागुंतीच्या प्रश्नांना पालकांना सामोरे जावे लागत आहे. जगण्याची भ्रांत मिटवता मिटवता दमछाक होणाऱ्या पालकांना या नव्या काळजीने त्रस्त केले आहेच. शिक्षणाचा दर्जा हा प्रश्न या सगळ्या प्रश्नांपेक्षा महत्त्वाचा असला, तरी तेथपर्यंत विचार पोहोचण्याची शक्तीही उरू नये, अशी ही स्थिती आहे. केवळ पाठ्यपुस्तकातील धडे शिकवण्यापलीकडे पसरलेले संस्कारांचे शिक्षणाचे क्षेत्र गेल्या काही वर्षांत इतके आकुंचित होत चालले आहे, की केवळ परीक्षा घेणे, यापेक्षा अधिक काही करण्याची क्षमता शिक्षणव्यवस्थेतच शिल्लक राहिलेली नाही की काय, अशी शंका यावी.

बदलापूरच्या शाळेत दोन चिमुकल्या मुलींवर झालेल्या लैंगिक अत्याचाराची तीव्र प्रतिक्रिया अस्वस्थ आणि हतबल समाजाची खूण आहे. उद्या अशी वेळ आपल्यावरही येऊ शकेल, अशी सुप्त भीती दबा धरून बसल्याने, हा तीव्र संताप व्यक्त झाला. सहा सात तास रेल्वे स्थानकात ठाण मांडून बसलेल्या नागरिकांना आश्वस्त करणे, मंत्र्यांनाही अशक्य झाले, याचा अर्थ प्रत्येकाच्या मनात दडून बसलेल्या भीतीला या आंदोलनाने मोकळी वाट करून दिली. बालकांवरील लैंगिक अत्याचार ही समस्या जागतिक पातळीवरील आहे. त्या प्रश्नाभोवती सामाजिक, शैक्षणिक वातावरण, आर्थिक परिस्थिती, कुटुंब व्यवस्था अशा अनेक उपप्रश्नांचे मोहोळ आहे. प्रत्येक पातळीवर प्रश्नाच्या मुळाशी जाऊन उत्तरे शोधण्याचा अव्याहत प्रयत्न करत राहणे, हीच प्राथमिक गरज आहे. बदलापूरच्या शाळेतील त्या दोन मुलींना स्वच्छतागृहात नेण्यासाठी पुरुष कर्मचाऱ्याऐवजी महिला का नव्हती? या पुरुष कर्मचाऱ्याला नोकरीत घेताना, त्याची संपूर्ण चौकशी करण्यात आली होती का? या घटनेबाबत शाळेच्या व्यवस्थापनाने तातडीने पोलिसांमध्ये तक्रार का केली नाही? पीडित मुलींच्या पालकांची तक्रार नोंदवून घेण्यास पोलिसांनी टाळाटाळ का केली? आंदोलनानंतर लगेचच शाळेवर, तेथील शिक्षकांवर, पोलीस कर्मचाऱ्यावर निलंबनाची कारवाई करणे, याचा अर्थ संबंधित यंत्रणांमध्ये संवेदनशीलतेचा अभाव आहे, असाच होत नाही का? या आणि अशा संभाव्य धोक्यांचा विचार करण्याची आवश्यकता शिक्षण व्यवस्थेतील प्रत्येकाने समजून घेणे म्हणूनच गरजेचे.

बदलापूर रेल्वे स्थानकात झालेला नागरिकांचा उद्रेक यापुढील काळात अशा घटना घडू नयेत, यासाठी प्रत्येक पातळीवर काळजीपूर्वक पाऊल टाकण्याची सूचना देणारा आहे. नागरिकांनी संबंधित कर्मचाऱ्याला जाहीर फाशी देण्याची केलेली मागणी कायद्यांना बगल देणारी आहेच, मात्र तातडीच्या कारवाईचे आश्वासन आंदोलकांचे समाधान का करू शकत नाही, याचा विचार संबंधित यंत्रणांनी करायलाच हवा. मुंबईसारख्या चाकाच्या शहरातील मध्यरेल्वेची लोकलसेवा काही तास ठप्प होण्याने निर्माण होणारे प्रश्नही तेवढेच गुंतागुंतीचे आहेत. समाजमन अशा घटनांमुळे विकल होते, बहुतेकवेळा जाहीर प्रतिक्रियाही व्यक्त होत नाही. समाजाचा कुणावरच विश्वास उरला नसल्याने, आश्वासनांची पूर्तता होण्याची खात्री देणारे नेतृत्व नसणे, हे बदलत्या सामाजिक परिस्थितीचे लक्षण आहे.

## संपादकीय....

# पिंजऱ्यातले पिंजऱ्यात

बँकांतील घटत्या रकमांची चिंता सरकारला वाटू लागली असेल तर पाणी दिसते त्यापेक्षा अधिक ठिकाणी मुरते आहे, हे लक्षात घ्यावे लागेल अर्थमंत्री निर्मला सीतारामन, रिझर्व्ह बँकेचे गव्हर्नर शक्तिकांत दास आदी मान्यवर गेले काही महिने एकच एक मुद्दा सातत्याने मांडताना दिसतात. तो म्हणजे बँकांतील घसरत्या ठेवींचा. आपल्याकडे बँकांत ठेवी ठेवणाऱ्यांचे प्रमाण सातत्याने घसरू लागले असून आहेत त्या ठेवींदारांतील निम्मे ठेवीदार हे वृद्ध गटातील आहेत. याचा अर्थ असा की कमावत्या वयातील तरुणांना आपल्या बँकांतील ठेवी तितक्या आकर्षक वाटेनाशा झाल्या आहेत. तरुण वयातील आकर्षणे वेगळी. ती बदलण्याचा वेगही वेगळा. ते योग्यच. कारण तरुणही वृद्धांप्रमाणेच वर्तन करू लागले तर 'जीर्ण शाल मग उरे शेवटी' हे 'लेणे तारुण्याचे' व्हायचे. मग सगळीच पंचाईत. तेव्हा तरुणांना बँकांतील ठेवी आकर्षक वाटत नसतील तर त्यांची निरिच्छा काही प्रमाणात निश्चित समजून घेता येईल. तथापि बँकांकडे पाठ फिरवण्याची तरुणांची वाढती सवय आणि त्याचवेळी बँकांकडून उचल/कर्ज घेण्याचे वाढते प्रमाण यामुळे एक विचित्र पेच भारतीय बँकांसमोर उभा ठाकलेला दिसतो. बँकांत पैसा येण्याचे घटते प्रमाण आणि त्याचवेळी कर्ज मागण्यास येणाऱ्यांचा वेग कायम असणे यातून पैशाचे बँकांतील आवक आणि जावक यातील संतुलन बिघडू लागले आहे. ही चिंतेची बाब. कारण बँकांत पैसा येणेच कमी झाले की बँका पैसा देणार कोठून? कोणीतरी ठेवी ठेवते म्हणून कोणाला तरी बँकांतून कर्ज मिळते. यात दोन-तीन टक्क्यांचा फरक असणे नैसर्गिक. पण सद्या:स्थितीत तो सहा टक्क्यांवर गेला असून त्यामुळे अर्थमंत्रालय आणि रिझर्व्ह बँक यांच्यात धोक्याची घंटा घणघणू लागली आहे. या धोक्याचे इशारे अर्थमंत्री आणि गव्हर्नर गेले काही महिने देत होते. अखेर या मुद्द्यावर अर्थमंत्र्यांनी सर्व बँक प्रमुखांशी सोमवारी चर्चा केली. आता या ठेवी कशा वाढवता येतील यासाठी प्रयत्न सुरू होतील. तेव्हा जनसामान्यांसाठी अत्यंत जिव्हाळ्याचा असलेला हा विषय लक्षात घ्यायला हवा. गेल्या, म्हणजे जुलै २०२४, महिन्याच्या अखेरीस आपल्या समस्त बँकांतील ठेवी २११.९३ ट्रिलियन रु. (२११.९३ लाख कोटी रु. ) इतक्या आहेत तर दिल्या गेलेल्या कर्जांची रक्कम आहे १६८.१४ लाख कोटी रु. इतकी. यावरून अजूनही पन्नासएक लाख कोटी रुपयांची कर्जे देता येतील इतकी बक्कळ रक्कम बँकांत पडून आहे, असे म्हणता येईल. म्हणजे लगेच खणखणाटास सामारे जावे लागेल, असे नाही. तथापि समस्या वर्तमानाची नाही. ती भविष्याची आहे. याचे कारण गेल्या वर्षभरात ठेवींचा दर हा कर्जाच्या दराच्या तुलनेत मागे मागे पडू लागला आहे. या वर्षात ठेवी वाढीचा वेग १०.६ टक्के इतका होता. तर कर्जे वाढीचा वेग आधी १३.७ टक्के आणि नंतर १६ टक्क्यांवर गेला. व्यक्तीस ज्याप्रमाणे उत्पन्नाच्या तुलनेत खर्च करणे वा हातउसन्या रकमा देणे अवघड असते त्याचप्रमाणे बँकांसाठीही हे संतुलन सांभाळणे आव्हान असते. त्यास 'कर्ज-पत गुणोत्तर' (क्रेडिट-डिपॉझिट रेश्यो) असे म्हणतात. बँका उगाच सढळ हस्ते कर्जे वाटत सुटू नये म्हणून त्यांना मिळणाऱ्या ठेवींतील विशिष्ट रक्कम सरकार दरबारी सुरक्षित ठेवीसाठी काढून द्यावी लागते. म्हणजे प्रत्येक १०० रुपयांच्या ठेवीतील ४.५ रु. रिझर्व्ह बँकेत रोख आणि १८ रु. सरकारी रोखे यात गुंतवणे बँकांवर बंधनकारक आहे. म्हणजेच प्रत्येक १०० रुपयांतील जेमतेम ७८.५ इतकीच रक्कम प्रत्यक्ष कर्जापोटी देण्यासाठी बँकांहाती राहते. तेव्हा बँकांतील ठेवींच्या घटत्या प्रमाणाची सरकारला इतकी चिंता का याचे उत्तर यावरून मिळेल. आता याबाबतच्या कारणांविषयी. यातील कळीचा प्रश्न म्हणजे बँकांतील ठेवींचे प्रमाण घसरण्याचे कारण काय? व्याजाचे दर हे यातील एक. सध्या बँकांतील निधींवर मिळणारा परतावा हा चलनवाढीशी जेमतेम बरोबरी साधू शकेल – न शकेल, इतका नगण्य आहे. बचत खात्यातील रकमेची तीन-साडेतीन टक्क्यांवर बोळवण होते तर ठेवींवर दोन-तीन टक्के अधिक मिळतात. भरगच्च रक्कम आणि दीर्घ कालावधी आणि परत ज्येष्ठ नागरिक असले तर एखाद्या अधिक टक्क्याची खिरापत. असे असताना ज्याची नजर भविष्याकडे आहे अशी कोणती शहाणी व्यक्ती बँकांच्या नादी लागेल? त्याचवेळी 'सिस्टिमॅटिक इन्व्हेस्टमेंट प्लान' (एसआयपी) सारख्या माध्यमातून अधिक किमान रकमांच्या आधारे चमचमीत परतावा देणाऱ्या अनेक गुंतवणूक योजना अनेक वित्तसंस्था घेऊन येत असतील तर अधिकाधिकांचे दिल कोणाकडे खेचले जाईल, हे सांगण्यास अर्थतज्ज्ञाची गरज नाही. बरे, या नव्या नटव्या योजनांस नावे ठेवण्याचीही सोय नाही. कारण त्यांच्या आधारे आपल्या गुंतवणुकीवर २०-२५ टक्के परतावा मिळवणाऱ्या इतक्या यशोगाथा इतक्या मध्यमवर्गीय कुटुंबांत अलीकडे वाढू लागलेल्या आहेत की त्यांच्या समोर बँकांच्या ठेवींचा आसरा शोधणारे 'नामर्द' ठरावेत. या अशाच 'एसआयपी' योजना भांडवली बाजाराबाबतही सुरू झालेल्या आहेत. आपणास जमेल तितक्या रकमेच्या आधारे सुरुवात करायची आणि आपली गुंतवणूक-वेल बहरताना पाहायची! हे हल्ली अनेक जण करतात. परत बँकांच्या तुलनेत भांडवली बाजाराच्या वेली वाढत्या ठेवण्यात सरकारलाही रस असल्याने बाजार उठणार नाही याची काळजी अगदी सर्वोच्च पातळीवर घेतली जाते. हे टाळण्यासाठी बँकांतील ठेवींवर व्याजदर आणखी आकर्षक करू जावे तर चलनवाढीचा धोका. आपली मानसिकता अशी की ठेवींवर जमेल तितके अधिक व्याज हवे आणि त्याचवेळी कर्जे मात्र जमेल तितकी स्वस्तात हवीत. हे असे होत नाही. ठेवींवरील व्याजदर कमी असल्याखेरीज पतपुरवठा स्वस्तात करता येणे अवघड. हे वास्तव. ते काही नव्याने समोर येत आहे असे नाही. पण तरीही बँकांतील घटत्या रकमांची चिंता सरकारला वाटू लागली असेल तर पाणी दिसते त्यापेक्षा अधिक ठिकाणी मुरते आहे, हे लक्षात घ्यावे लागेल. म्हणूनच विविध खासगी तसेच सरकारी बँकांच्या प्रमुखांनी आपापल्या बँकांत ठेवी ठेवणे अधिकाधिक आकर्षक कसे होईल याचे प्रयत्न सुरू केल्याचे दिसते. अधिक व्याज, ज्येष्ठ नागरिकांस विशेष सोयी, ठरावीक रकमेच्या वरील ठेवींवर जास्त व्याज इत्यादी उपाय विविध बँका जाहीर करू लागल्या आहेत. पण हे किती बँकांस किती प्रमाणात करता येणार यास मर्यादा आहेत. बुडीत खात्यात गेलेली कर्जे आणि निव्वळ नफा या त्या मर्यादा. अनेक बँकांनी आपले ताळेबंद स्वच्छ आणि डागरहित आहेत हे दखवण्यासाठी बुडीत खात्यातील कर्जे पुसून टाकली. हे एखाद्या चलाख विद्यार्थ्याने अनुत्तीर्णतेचा लाल शेरा टाळण्यासाठी तो विषयच प्रगतिपुस्तकावर येणार नाही, अशी 'व्यवस्था' करण्यासारखे. तशी अधिकृत सोय बँकांना असल्याने अनेकांनी हा उद्योग केला. परिणामी 'दिसणाऱ्या' बुडत्या कर्जांच्या रकमा गायब झाल्या. त्यातून बँकांना हात झटकण्याची सोय झाली असेल. पण त्यामुळे बँकांच्या किफायतशीरतेवर त्याचा परिणाम झाला.

# जिटल व्यवहारात वाढ, पण



आज भारत डिजिटल क्रांतीमध्ये आघाडीवर आहे. 'डिजिटलायझेशन' पुढील पिढीसाठी मार्ग अजून सुलभ करत आहे. फक्त तो शंभर टक्के सुरक्षित असण्याची हमी हवी.

रिझर्व्ह बँकेच्या नुकत्याच प्रकाशित झालेल्या अहवालानुसार, डिजिटल क्रांतीमध्ये जगात भारताचे स्थान अग्रणी आहे. जगातील डिजिटल व्यवहारामध्ये भारताचा वाटा ४८.५ टक्के आहे.आज भारतातील डिजिटल अर्थव्यवस्था नियमितपणे वाढत आहे. २०१४ मध्ये ती सकल देशांतर्गत उत्पादनाच्या(जीडीपी) ४.५ टक्के होती व आज ती जीडीपीच्या १२ टक्के आहे आणि २०२६-२०२७ पर्यंत ती जीडीपीच्या २० टक्क्यावर, म्हणजे जीडीपीच्या एकपंचाश असेल. याचाच घेतलेला हा आढावा.

वित्तीय सेवा

आज अधिकांश आर्थिक व्यवहार जसे, बँकेचे व्यवहार, खरेदी (ऑनलाइन), विविध घरगुती बिलांचा भरणा, रेल्वे, विमानाचे व बसचे तिकिटे, हॉटेल बुकिंग (अगदी परदेशातीलसुद्धा), काही वस्तू मागवायचे असतील इत्यादी आपण सहजपणे घरी बसल्या करू शकतो. घरून बाहेर पडताना खिशात एकही पैसा नसला तरी, गरज भासल्यास आर्थिक व्यवहार मोबाइलद्वारे सहज करू शकतो. रोख रक्कम व एटीएम कार्डची पण गरज आता उरली नाही. डिजिटलायझेशनमुळे वित्तीय सेवांची चांगली सोय झाली आहे.

बेरोजगारीत वाढ

डिजिटल तंत्रज्ञानातील प्रगतीमुळे आर्थिक क्षेत्रात लक्षणीय बदल होत आहेत; पण डिजिटल व्यवहारामुळे भारतात रोजगारावर परिणाम होताना दिसतो. डिजिटल दशकाच्या सुरुवातीपासून स्वयंचलितेमुळे (ऑटोमेशन), कारकुनी कामाची गरज कमी होताना दिसते. परिणामी मध्यम आणि कनिष्ठ श्रेणीमधील नोकर्या कमी झाल्या आहेत. त्यामुळे अधिकार्यांच्या सहाय्यक कर्मचार्यांच्या प्रमाणावर परिणाम झाला आहे, जो आर्थिक वर्ष २०११ मध्ये ५०:५० वरून आर्थिक वर्ष २०२३ मध्ये ७४:२६ वर गेला आहे. कृत्रिम बुद्धिमत्तेमुळेही (एआय) या क्षेत्रातील नोकरीच्या उपलब्धतेत आणखी व्यत्यय येण्याची शक्यता आहे.

आर्थिक श्रमाचे विकेंद्रीकरण

रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाचे गव्हर्नर शक्तिकांत दास यांनी केंद्रीय बँकेच्या चलन आणि वित्त विषयक अहवालाच्या अग्रलेखात डिजिटल व्यवहारांमुळे आलेल्या आव्हानांवर प्रकाश टाकला आहे. ते म्हणतात, डिजिटलायझेशन म्हणजे आउटसोर्सिंग आणि टेलिवर्कद्वारे आर्थिक श्रमाचे विकेंद्रीकरण. मजुरांच्या जागी ऑटोमेशन केल्याने भांडवल आणि श्रम परतावा यामधील अंतर संभाव्यतः वाढू शकते, कमी-कौशल्य/कमी-पगार आणि उच्च-कौशल्य/उच्च पगाराच्या नोकर्यांसह एक खंडित कामगार बाजार तयार होऊ शकतो, तर मध्यमस्तरीय नोकर्या तंत्रज्ञानामुळे विस्थापित होतात. या अहवालात, वर्ष २०२३ मधील एकूण भरतीच्या तुलनेत कृत्रिम बुद्धिमत्ता प्रतिभा भरतीमध्ये १६.८ टक्के वाढ झाली आहे, असे नमूद केले आहे.

आर्थिक फसवणूक प्रकारात वाढ

आर्थिक व्यवहारातील डिजिटलायझेशनमुळे आर्थिक फसवणुकीचे प्रकारही वाढत आहेत. जानेवारी ते एप्रिल २०२४ दरम्यान भारतीय नागरिकांना सायबर गुन्हेगारी कारवायांमुळे १७५० कोटी रुपयांपेक्षा जास्त नुकसान सहन करावे लागले. नॅशनल सायबर क्राइम रिपोर्टिंग पोर्टल, जी गृहमंत्रालयाद्वारे व्यवस्थापित केली जाते, त्यावर ७ लाख ४० हजारांहून अधिक तक्रारींची नोंद करण्यात आली.

ऑनलाइन आर्थिक फसवणूक

इंडियन सायबर क्राइम कोऑर्डिनेशन सेंटरने (१४ सी) (जी गृहमंत्यालयाने सायबर गुन्ह्यांचा सामना करण्यासाठी कायद्याची अंमलबजावणी करणार्या एजन्सीसाठी एक समन्वयक म्हणून काम करते) म्हटले आहे की मे, २०२४ मध्ये दररोज सरासरी ७ हजार सायबर गुन्ह्यांच्या तक्रारी नोंदवल्या गेल्यात. तसेच वर्ष २०२१ ते २०२३ या तीन वर्षांच्या कालावधीच्या तुलनेत यात ११३.७ टक्क्यांनी लक्षणीय वाढ झाली आहे. याशिवाय यातील ८५ टक्के तक्रारी आर्थिक ऑनलाइन फसवणुकीशी संबंधित आहेत. भारतीय ऑनलाइन गुंतवणूक, गेमिंग ॲप्स, बेकायदेशीर कर्ज देणारी ॲप्स, सेक्सटोर्शन आणि ओटीपी घोटाळ्यांना सर्वाधिक बळी पडले आहेत. आता सायबर गुन्हेगार ज्येष्ठ नागरिकांना 'डिजिटल अटक' झाल्याची बतावणी करून त्यांच्याकडून पैसे उकळण्याच्या घटनाही समोर येत आहेत.

फिशिंग हल्ले प्रमाणात वाढ

आणखी एक महत्त्वाची चिंतेची बाब म्हणजे भारतातील डेटा लीकची वाढती किंमत, जी वर्ष २०२० ते २०२३ दरम्यान २८ टक्क्यांनी वाढून २ दशलक्ष डॉलर्सपर्यंत पोहोचली आहे. सद्यपरिस्थितीत, सायबर जोखीम विशेषतः फिशिंग हल्ले आणि तडजोड केलेली क्रेडेन्शियल्स अत्यंत प्रचलित आहेत. आज सायबर जोखीममध्ये फिशिंग हल्ल्यांची टक्केवारी २२ टक्के आहे, तर चोरी किंवा तडजोड केलेली प्रकरणे १६ टक्के आहेत. आज सायबर गुन्ह्यांमध्ये भारत दहाव्या क्रमांकावर आहे.

व्यक्तिगत फसवणूक टाळण्यासाठी

ऑनलाइन खरेदी करताना आपल्या डेबिट/क्रेडिट कार्ड तपशील जतन केले जात नाहीत याची खात्री करणे महत्त्वाचे आहे. ऑनलाइन खरेदी पूर्ण केल्यानंतर कार्डची माहिती मिटविणे चांगले, जेणेकरून ते चोरीला जाण्याचा धोका राहात नाही. डिजिटल पेमेंट करताना स्वतःचे संरक्षण करण्याचा सर्वात प्रभावी मार्ग म्हणजे संशयास्पद ॲप्स आणि वेबसाइट्स टाळणे आणि ॲप स्टोअरमध्ये सुचवलेल्या विश्वसनीय अधिकृत ॲप्सवर नेहमी अवलंबून राहणे. ओटीपी व पासवर्ड कधीच कोणाला सांगू नये. सार्वजनिक संगणक/वाय-फाय नेटवर्क वापरणे टाळले पाहिजे. ॲप स्टोअर आणि प्ले स्टोअरवर अनेक बेकायदेशीर ॲप्स असतात, जे उपयोगात आणण्याआधी तपासून बघावी नंतरच ती उपयोगात आणावी.

सुरक्षा आणि कार्यक्षमतेवर भर

डिजिटल व्यवहारांमुळे करोडो भारतीयांचे आर्थिक व्यवहार अधिक सुलभतेने होत आहेत. ते व्यवहार सुरक्षित व अधिक सुलभ करण्यासाठी सरकारी आणि खासगी क्षेत्र डिजिटल फायनान्स इकोसिस्टममध्ये गुंतवणूक करणे आणि विकसित करणे आवश्यक आहे. ब्लॉकचेन आणि आर्टिफिशियल इंटेलिजन्ससारख्या नवीन तंत्रज्ञानामुळे डिजिटल पेमेंट क्षेत्रात बदल होऊन सुरक्षा आणि कार्यक्षमता सुधारण्याचा अंदाज आहे तसेच डिजिटलायझेशनच्या आव्हानांना तोंड देण्यासाठी प्रामुख्याने तरुणांच्या कौशल्यामध्ये वाढ करण्याची गरज आहे. पण ही आवश्यक कौशल्ये विकसित करण्यासाठी भरीव गुंतवणुकीचीही गरज आहे.

# ३,५००/–रुपयाची लाच स्वीकारताना किनवट येथील मनरेगा (कंत्राटी) ऑपरेटर अविनाश भुरेवार चतुर्भुज

किनवट/शेख शौकत :–मनरेगा अंतर्गत प्रधानमंत्री आवास योजनेचे एकुण ७ मस्टर पंचायत समिती किनवट कार्यालयात पुढील कार्यवाही करणेकरिता दिल्यास लाचखोर ऑपरेटर आरोपी अविनाश विश्वनाथ भुरेवार यास ३,५००/– रुपयाच्या लाच स्वीकारताना नांदेडच्या लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने रंगेहाथ पकडून कार्यवाही केली.या कार्यवाहीनंतर किनवट भागात एकच खळबळ उडाली आहे. याबाबत सविस्तर वृत्त असे कि तक्रारदार यांनी मौजे शिरपुर,ता.किनवट, जि.नांदेड येथील ग्रामपंचायत हद्दीतील मनरेगा अंतर्गत प्रधानमंत्री द आवास योजनेचे एकुण ७ मस्टर पंचायत समिती किनवट येथे सादर केले. सदर मस्टरवर पुढील कार्यवाही करणेकरिता आरोपी अविनाश विश्वनाथ भुरेवार,वय ३२ वर्षे, ऑपरेटर (कंत्राटी) मनरेगा,पंचायत समिती,किनवट,ता. किनवट,जि.नांदेड यांनी तक्रारदार यांच्याकडे प्रत्येक मस्टरचे ५००/– रूपये याप्रमाणे एकुण ३५००/ रूपयांची मागणी मागणी केली. सदरची रक्कम ही लाच असल्याची तक्रारदार यांना खात्री झाली. तक्रारदार यांना सदरची लाच देण्याची इच्छा नसल्याने,त्यांनी दिनांक १६/०८/२०२४ लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, नांदेड येथे याबाबत तक्रार दिली. मिळालेल्या तक्रारीवरून लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, नांदेडकडून लाच मागणीची पडताळणी केली असता, आरोपी अविनाश भुरेवार यांनी तक्रारदार यांचे ७ मस्टरचे पुढील कारवाई करणे करिता प्रत्येकी ५००/– रूपये याप्रमाणे ३५००/– रूपयाची पंचासमक्ष




लाचेची मागणी केली. त्यावरून करण्यात आलेल्या सापळा कार्यवाही दरम्यान आरोपी अविनाश विश्वनाथ भुरेवार यांनी तक्रारदार यांचेकडून पंचायत समिती कार्यालय, किनवट,ता. किनवट,जि.नांदेड येथे पंचासमक्ष लाचेची रक्कम ३५००/– रुपये स्विकारतांना लाचेच्या रकमेसह रंगेहात पकडले आहे. सदर कार्यवाहीत आरोपी लोकसेवकास ताब्यात घेण्यात आले असून पोलीस स्टेशन किनवट,जि. नांदेड येथे गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरू आहे. हि सापळा कार्यवाही संदीप पालवे, पोलीस अधीक्षक, अँटी करप्शन ब्युरो,नांदेड परिक्षेत्र मो.क्र. ९५४५५३१२३४, पर्यवेक्षण अधिकारी श्री प्रशांत पवार, पोलीस उप अधीक्षक, अँटी करप्शन ब्युरो, नांदेड मो.क्र. ९८७०१४५९१५ यांच्या मार्गदर्शनाखाली सापळा व तपास अधिकारी श्री गजानन बोडके, पोलीस निरीक्षक, अँटी करप्शन ब्युरो, नांदेड यांनी त्यांचे सापळा कारवाई पथक अँटी करप्शन ब्युरो, नांदेड टीमने केली आहे. या कार्यवाही नंतर लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने नांदेड जिल्ह्यातील सर्व नागरिकांना आवाहन करण्यात येते की, त्यांच्याकडे कोणत्याही लोकसेवकाने, शासकीय अधिकारी कर्मचारी यांनी किंवा त्यांच्या वतीने खाजगी इसम (एजंट) यांनी कोणतेही शासकीय काम करून देण्यासाठी कायदेशीर फी व्यतिरिक्त अन्य लाचेची मागणी करीत असल्यास तात्काळ खालील क्रमांकावर संपर्क साधावा. दुरध्वनी ०२४६२–२५३५१२, टोल फ्रि क्रं. १०६४ हा क्रमांक देण्यात आला आहे.

## कॉफी बनवण्यासाठी फिल्टर नाहीये? मग 'अशा' पद्धतीने ५ मिनिटांमध्ये बनवा वाफाळती फिल्टर कॉफी

सर्वच ऋतूंमध्ये चहाप्रमाणे कॉफी पिण्याचा मोह काहींना आवरत नाही.चहापेक्षा जास्त कॉफी पिण्यास प्राधान्य दिले जाते. जगभरातील अनेक देशांमध्ये कॉफी पिणाऱ्या लोकांची संख्या जास्त आहे. चहाप्रमाणे कॉफीप्रेमी सुद्धा आहेत. घरी थकून आल्यानंतर किंवा पावसाळ्याच्या दिवसांमध्ये थंड वातावरणात सगळ्यांचं चहा कॉफी प्यायला आवडते.गरमागरम कॉफी प्यायला सगळ्यांचं आवडते. त्यात जर ती फिल्टर कॉफी असेल तर कधीच कोणी कॉफी पिण्यास नकार देत नाही. अनेकदा बाहेर गेल्यानंतर किंवा कॅफेमध्ये जाऊन फिल्टर कॉफी प्यायली जाते. पण ही कॉफी तुम्ही घरच्या घरीसुद्धा बनवू शकता. दक्षिण भारतामध्ये प्रामुख्याने सगळीकडे फिल्टर कॉफी प्यायली जाते.फिल्टर कॉफी बनवण्यासाठी फिल्टरचा वापर केला जातो. या फिल्टरमध्ये एका वेळेस दोन ते तीन पिऊ शकतील एवढीच कॉफी बनवता येते. हॉटेल्स, कॅफे, रेस्टॉरंट किंवा उडपी हॉटेल्स हमखास फिल्टर कॉफी मिळते. पण ही कॉफी फिल्टरशिवाय घरी बनवणे अशक्य, असे अनेकांना वाटते. पण आज आम्ही तुम्हाला फिल्टरचा वापर ना करता घरच्या घरी फिल्टर कॉफी कशी बनवायची याची सोपी रेसिपी सांगणार आहोत. कमीत कमी वेळेत फिल्टर कॉफी बनवता येते. त्यामुळे आज आम्ही तुम्हाला उडुपी स्टाईल फिल्टर कॉफी कशी बनवायची याची सोपी रेसिपी जाणून घेऊया.साहित्य: गरम पाणी चहा साखर दूध कॉटनचा कापड कृती: फिल्टर कॉफी बनवण्यासाठी सर्वप्रथम एका टोपात पाणी गरम करून घ्या. उकळलेल्या पाण्यात कॉफी पावडर टाकून ती चमच्याने व्यवस्थित मिक्स करून घ्या. कॉफी पावडर टाकून झाल्यावर उकळत्या पाण्यावर झाकण ठेवा. कॉफी व्यवस्थित उकळण्यासाठी ठेवा. कॉफी व्यवस्थित उकळून झाल्यानंतर ग्लासवर कॉटनचा कपडा ठेवून कॉफी गाळून घ्या.

# रस्त्यांवरील खड्ड्यांची तक्रार आता मोबाईल ॲपद्वारे नोंदविता येणार

## सार्वजनिक विभागाकडून खड्डे तक्रार निवारण प्रणाली विकसित

लातूर : – सार्वजनिक बांधकाम विभागाने १ लाख १८ हजार किमीपेक्षा अधिक रस्त्यांचे जाळे तयार केले आहे. यामध्ये प्रमुख राज्य महामार्ग, राज्य महामार्ग व प्रमुख जिल्हा मार्गांचा समावेश आहे. या रस्त्यांवर पावसाळ्यानंतर पडणाऱ्या खड्ड्यांची माहिती सार्वजनिक विभागाला देण्यासाठी खड्डे तक्रार निवारण प्रणाली विकसित करण्यात आली असल्याची माहिती सार्वजनिक बांधकाम विभागाचे अधीक्षक सलीम शेख यांनी दिली. सार्वजनिक बांधकाम विभागामार्फत नियमित दुरूस्ती केली जाते. मात्र, सर्वसाधारणपणे पावसाळ्यानंतर रस्त्यांवर खड्डे पडतात. त्यामुळे या खड्ड्यांच्या तक्रारींचे निराकरण करण्यासाठी खड्डे तक्रार निवारण प्रणाली (पीसीआरएस) विकसित करण्यात आली आहे. या अँड्रॉइड पद्वारे सर्व नागरिकांना सार्वजनिक विभागाच्या रस्त्यांवरील खड्ड्यासंबंधी तक्रारी नोंदविता येणार आहेत. हे मोबाईल पल या लिंकचा वापर करून सार्वजनिक बांधकाम विभागाच्या वेबसाईटवरून डाऊनलोड करता येईल. तसेच गुगल प्ले स्टोअरवर कोणत्याही अँड्रॉईड मोबाईलमध्ये इंस्टॉल करता येईल. त्यासाठी या लिंकचा वापर करावा.

पीसीआरएस अँड्रॉइड प द्वारे खड्ड्यांसंबंधीच्या तक्रारी नोंदविण्याची प्रक्रिया–
१) नागरिकांनी त्यांच्या अँड्रॉइड फोनवर पीसीआरएस प इंस्टॉल करावे. त्यासाठी आवश्यक जीपीएस आणि स्टोअरेजकरिता परवानग्या द्याव्यात.
२) या पमध्ये तुमचा मोबाईल नंबर टाका, तुम्हाला एसएमएसद्वारे वन–टाइम पासवर्ड (ओटीपी) प्राप्त होईल. लॉग इन करण्यासाठी कृपया हा ओटीपी टाकावा.
३) खड्ड्यांची तक्रार नोंदवण्यासाठी ' रजिस्टर फीडबॅक ' बटणावर क्लिक करा आणि आपला मोबाईल जीपीएसच्या सहाय्याने आपले वर्तमान स्थान दर्शवेल, त्यानंतर कॅमेरा आयकॉनवर क्लिक करा, पीसीआरएस प आपला मोबाईल कॅमेरा उघडेल, त्यानंतर खड्ड्याचे छायाचित्र काढा व आपले तक्रार मोबाईलमार्फत टिप्पणीसह सबमिट करा.
४) तक्रार नोंदवल्यानंतर पीसीआरएस पवर रस्त्याचे नाव, तालुका, साखळी क्रमांक इत्यादर माहिती वरुन संबंधित सार्वजनिक बांधकाम विभागाचे क्षेत्रीय अधिकारी ओळखेल, जर खड्डेबाबत तक्रार प्राप्त झालेला रस्ता हा सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अखत्यारितील असल्यास प्रणालीद्वारे तक्रार क्रमांक तयार होईल व तसे नागरिक आणि संबंधित कार्यालयातील कनिष्ठ अभियंता, उपअभियंता आणि कार्यकारी अभियंता यांना एसएमएसद्वारे कळविले जाईल.
५) क्षेत्रीय कार्यालय कनिष्ठ अभियंता हे खड्डे दुरुस्त करतील आणि ७२ तासांच्या आत अँड्रॉइड पद्वारे उत्तर देईल. त्यानंतर क्षेत्रीय उपअभियंता कनिष्ठ अभियंत्याच्या उत्तराची पडताळणी करतील आणि शेवटी १ दिवसाच्या आत नागरिकास अनुपालन सादर करतील व नागरिकास एसएमएसद्वारे सूचित केले जाईल. नागरीक वेळोवेळी पीसीआरएस पवरुन त्यांच्या तक्राराची स्थिती पाहू शकतात.
६) सात दिवसांपर्यंतच्या विलंबावर उपअभियंता स्तरावर देखरेख ठेवली जाईल, ७ ते १५ दिवसांच्या विलंबाची प्रकरणे संबंधित कार्यकारी अभियंत्याद्वारे पुनरविलोकन केले जाईल. १५ ते ३० दिवसांच्या विलंबाचे निरीक्षण संबंधित अधीक्षक अभियंताद्वारे केले जाईल. ३० दिवसांपेक्षा जास्त विलंब झाल्यास संबंधित प्रादेशिक विभागाच्या मुख्य अभियंताद्वारे पुनर्विलोकन आणि निरीक्षण केले जाईल.

# चेहऱ्यावरील मुरुमांपासून सुटका मिळवण्यासाठी करा 'हे' घरगुती उपाय, त्वचा होईल स्वच्छ

वाढत्या वयानुसार चेहऱ्यामध्ये अनेक बदल होत असतात. त्यामध्ये चेहऱ्यावर मुरूम येणं ही एक सामान्य समस्या आहे. चेहऱ्यावर मुरूम आल्यानंतर त्वचा पूर्णपणे खराब होऊन जाते. मुरूम, मुरुमांचे डाग, फोड इत्यादी गोष्टींमुळे चेहरा पूर्णपणे खराब होऊन जातो. यामुळे चेहऱ्यावरील चमक निघून जाते. मुरूम किंवा फोड आल्यानंतर त्याचे डाग चेहऱ्यावर तसेच राहतात. डाग घालवण्यासाठी महिला अनेक प्रयत्न करतात. बाजारात मिळणाऱ्या महागड्या क्रीम्स किंवा मग चेहरा उजळवणाऱ्या क्रीम लावल्या जातात. या क्रीम लावल्यामुळे त्वचेचे नुकसान होते. त्यामुळे आज आम्ही तुम्हाला महागड्या क्रीम्स वापरण्यापेक्षा घरगुती उपाय करून पहा. हे उपाय केल्यामुळे तुमची त्वचा स्वच्छ होऊन सुंदर आणि चमकदार दिसेल. (फोटो सौजन्य–ळींलज्ञ)

त्वचेसाठी गुणकारी मध:



मध हे नैसर्गिक एक्सफोलिएटर म्हणून त्वचेवर काम करते. मध लावल्यामुळे त्वचेचा रंग उजळण्यास मदत होते. तसेच मुरुमांचे डाग घालवण्यासाठी मधाचा वापर करावा. मधामध्ये बॅक्टेरियाच्या वाढीस प्रतिबंध करणारे पदार्थ आणि दाहक–विरोधी गुणधर्म असतात. त्यासाठी रात्री झोपण्यापूर्वी मुरूम आलेल्या ठिकाणी मध लावून रात्रभर तसेच ठेवून घ्या. त्यानंतर सकाळी उठल्यावर चेहरा स्वच्छ पाण्याने धुवा. यामुळे तुमच्या चेहऱ्यावरील मुरुमांचे डाग निघून जातील. कोरफड जेल:

चेहऱ्यावरील मुरुमांचे डाग घालवण्यासाठी कोरफड जेल अतिशय प्रभावी आहे. यासाठी एका वाटीमध्ये कोरफड जेल घेऊन त्यात कडुलिंबाची पावडर मिक्स करून चेहऱ्याला लावा. चेहरा कोरडा झाल्यानंतर पाण्याने चेहरा स्वच्छ धुवा. यामुळे तुमच्या चेहऱ्यावर आलेले मुरूम आणि मुरुमांचे डाग निघून जाण्यास मदत होईल.

हिरवा चहा( ग्रीन टी):

त्वचेचे आरोग्य सुधारण्यासाठी ग्रीन टी अतिशय प्रभावी आहे. यासाठी अर्धा वाटी पाणी घेऊन त्यात ग्रीन टी उकळा. त्यानंतर तयार केलेले पाणी गाळून स्प्रे बाटलीमध्ये भरा आणि चेहऱ्यावर सकाळ आणि संध्याकाळी स्प्रे करा. यामुळे मुरुमांचे डाग निघून जाण्यास मदत होईल.

# उपवासाच्या दिवशी झटपट बनवा मखाण्याचा चिवडा, चवीला अप्रतिम अन् आरोग्यासाठी फायदेशीर!

श्रावण महिना सुरु झाला आहे. या महिन्यात अनेकजण देवाचे नामस्मरण करत व्रत करत असतात. या महिन्यात केलेल्या व्रताने प्रसन्न होऊन देव आपल्या मनोइच्छा पूर्ण होतात, अशी मान्यता आहे. उपवास असला की, तेच तेच उपवासाचे पदार्थ आठवू लागतात जसे की, साबुदाणा खिचडी, बटाटयाची उसळ मात्र तुम्हालाही हे बोरिंग पदार्थ खाऊन कंटाळा आला असेल आणि काहीतरी टेस्टी आणि नवीन काही खावेसे वाटत असेल तर आजची ही रेसिपी तुमच्या फायद्याची ठरणार आहे.

संध्याकाळी अनेकदा हलकी हलकी भूक लागते. अशात तळणीचे पदार्थ अधिकतर आठवतात. मात्र जर तुम्ही उपवास करत असाल आणि तुम्हाला काही हेल्दी खायचे असेल तर तुम्ही घरी अगदी कमी वेळेत पौष्टिक मखाण्याचा चिवडा तयार करू शकता. हा चिवडा चवीबरोबरच आरोग्यसाठीही फायद्याचा ठरतो. मखाण्यामध्ये अनेक जीवनसत्त्वे, खनिजे, कॅल्शियम, मॅग्नेशियम, लोह आणि फॉस्फरसदेखील मुबलक प्रमाणात असतात. ज्यामुळे अनेक आजरांपासून दूर राहता येते. जाणून घ्या यासाठी हा चिवडा तयार करण्यासाठी लागणारे साहित्य आणि कृती.

साहित्य ३ कप मखाने ५ चमचे तूप २ कप शेंगदाणे मीठ चवीनुसार कृती मखाण्याचा चिवडा तयार करण्यासाठी सर्वप्रथम गॅसवर एक कढई ठेवा यानंतर यात तूप टाका

मग यात मखाणे टाकून मध्यम आचेवर हे मखाणे परतून घ्या मखाणे भाजून झाले की एका ताटात काढून घ्या यानंतर याच कढईत शेंगदाणे भाजून घ्या शेंगदाणे भाज्यानंतर पुन्हा कढईत मखाणे घाला आता यात चवीनुसार मीठ टाका आणि मिक्स करा हे मिश्रण व्यवस्थित



परतल्यानंतर गॅस बंद करा अशाप्रकारे तुमचा मखाण्याचा चिवडा तयार होईल

कुटुंबासोबत या चिवड्याचा आस्वाद घ्या

# स्वयंपाकघरात असलेल्या 'या' गोष्टींचा वापर करुन कानात साठलेली घाण आपोआपच बाहेर पडेल, जाणून घ्या

कान हा आपल्या शरीराचा एक महत्त्वाचा भाग आहे. म्हणून, वेळोवेळी कान स्वच्छ करणे फार महत्वाचे आहे. आपल्या कानात एक चिकट पदार्थ तयार होतो, त्याला कान मेण म्हणतात. हे आपल्या कानाच्या आत विकसित होते आणि त्याची भूमिका आपल्या कानाचे जीवाणू, बुरशी आणि पाण्यापासून संरक्षण करते आणि साफसफाई आणि स्नेहन करण्यास देखील मदत करते. तथापि, कधीकधी हे कानातले मेण मोठ्या प्रमाणात कानात जमा होते, ज्यामुळे संसर्गाचा धोका निर्माण होतो किंवा ऐकण्याची क्षमता कमी होते. काही लोक कानातले मेण साफ करण्यासाठी इअरबड्स वापरतात, ज्यामुळे कानाच्या पडद्यावर दाब पडतो आणि तुम्हाला बहिरे होण्याचा धोकाही असतो. कानातील घाण साफ करण्यासाठी काय करावे ते जाणून घेऊया.




कानातील घाण साफ करण्याचे मार्ग ग्लिसरीन कानाची घाण साफ करण्यासाठी ग्लिसरीनचे काही थेंब वापरता येतात. ग्लिसरीन इअरवॅक्स काढून टाकण्यास मदत करेल आणि तुमच्या कानाची त्वचादेखील मऊ करू शकते. तेल तुम्ही बेबी ऑईल, ऑलिव्ह ऑईल किंवा खोबरेल तेल थोडे गरम करून कानात घालू शकता. तेल कानातले मेण मऊ करण्यास मदत करू शकते. सोडा बेकिंग सोडाचे द्रावणदेखील मेण मऊ करण्यास मदत करू शकते. तुम्ही पाणी आणि बेकिंग सोडा वापरून उपाय बनवू शकता आणि त्याचे काही थेंब कानात टाकू शकता.

पाणी कानातील घाण साफ करण्यासाठी गरम पाण्याचाही वापर करू शकता. यासाठी एका कपमध्ये गरम पाणी घ्या हे पाणी काळजीपूर्वक कानात घाला आणि मग काढून टाका. यामुळे घाण मऊ होईल आणि आरामात बाहेर येऊ शकेल.

# पिंपल्समुळे आलेले डाग घालवण्यासाठी करा बीटरूट पावडरचा वापर, जाणून घ्या वापरण्याची योग्य पद्धत

विटामिन सी युक्त बीटरूटचे सेवन केल्यामुळे शरीरातील विटामिनची कमतरता भरून निघते. बीटरूटमध्ये अँटीऑक्सिडंट्स, आयर्न आणि फोलेट आढळून येते. तसेच यामध्ये असलेले लोहामुळे शरीरातील रक्ताची कमतरता भरून निघते. शरीरामध्ये रक्ताची कमतरता जाणवू लागल्यानंतर आहारात बीटरूट आणि डाळिंबाच्या दाण्यांचे सेवन करावे. यामध्ये असलेल्या गुणधर्मांमुळे शरीरातील अनेक सकारात्मक बदल दिसून येतात. निरोगी आरोग्यासाठी जशी आहाराची आवश्यकता असते, तशीच निरोगी त्वचा ठेवण्यासाठी सुद्धा आहाराचीच आवश्यकता असते. शरीराला आतून पोषण मिळाले तरच त्वचेवर ग्लो दिसतो.

आहारात पोषक घटकांची कमतरता जाणवू लागल्यानंतर त्वचा आणि केसांचे सौंदर्य खराब होण्यास सुरुवात होते. यामुळे चेहऱ्यावर पिंपल्स येणे, फोड येणे, मुरूम येणे इत्यादी अनेक समस्या जाणवू लागतात. तसेच संपूर्ण शरीर डिहाड्रेट होऊन जाते.





त्वचेचा बिघडलेला रंग सुधारण्यासाठी अनेक प्रयत्न केले जातात. त्यामुळे आज आम्ही तुम्हाला त्वचा रंग नि पोत सुधारण्यासाठी बीटरूट पावडरचा वापर कसा करावा,याबद्दल सविस्तर माहिती सांगणार आहोत. बीटरूट त्वचेच्या आरोग्यासाठी प्रभावी असल्यामुळे बीटरूटपासून तयार केलेल्या पावडरचा वापर तुम्ही त्वचेसाठी करू शकता. बीटरूट पावडरचे त्वचेला असलेले फायदे:

लोह आणि अँटी अँटिऑक्सिडंटने समृद्ध असलेली बीटरूट पावडर आरोग्यासाठी फायदेशीर आहे. त्वचेवर गुलाबी आणि लाल चमक आणण्यासाठी बीटरूट पावडरचा वापर करावा. यामुळे त्वचा ताजी आणि चमकदार दिसते. फ्री रॅडिकलमुळे त्वचेचे होणारे नुकसान टाळण्यासाठी बीटरूट पावडरचा वापर करावा.

अपुऱ्या झोपेमुळे डोळ्यांखाली आलेली काळी वर्तुळ घालवण्यासाठी बीटरूट पावडरचा वापरून ही डोळ्यांखालील वर्तुळे घालवू शकता. बीटरूट पावडर त्वचेचा रंग एक समान करण्यासाठी मदत करते.

बीटरूट पावडरमध्ये असलेले अँटिऑक्सिडंट्स आणि फायटोन्यूट्रिएंट्स चेहऱ्यावरील पिगमेंटेशन कमी करून त्वचेचा रंग सुधारण्यासाठी मदत करते. तसेच यामुळे चेहऱ्यावरील बारीक रेषा आणि सुरकुत्या कमी होतात.

चेहऱ्यावर आलेले मुरूम आणि पुरळचे डाग घालवण्यासाठी बीटरूटचा फेसपॅक करून चेहऱ्यावर लावावा. यामुळे डाग निघून जाऊन त्वचा स्वच्छ होईल. तसेच चेहरा अधिक काळ तरुण दिसण्यासाठी मदत होईल.

बीटरूट पावडर अशा पद्धतीने वापरा: फेसपॅक: बीटरूट पावडरचा वापर करून तुम्ही फेसपॅक बनवू शकता. यासाठी बीटरूट पावडरमध्ये एका चमचा दही आणि गुलाब पाणी मिक्स करा. जाडसर पेस्ट तयार केल्यानंतर संपूर्ण चेहऱ्याला पेस्ट लावून चेहरा कोरडा होण्यासाठी ठेवा. यामुळे त्वचा मॉइश्चरायझ होऊन चेहऱ्यावरील काळा पडलेला रंग सुधारण्यास मदत होईल. लिप बाम: बीटरूट पावडरचा वापर करून लिप बाम बनवू शकता. यासाठी खोबरेल तेल किंवा शिया बटरमध्ये बीटरूट पावडर मिक्स करा आणि डब्यात भरून ठेवा. रात्री झोपताना नियमित हे लिप बाम लावल्यास ओठांचा रंग सुधारून ओठ गुलाबी आणि मऊ होतील.

# दुर्मिळ वनस्पतींचा विकास आणि संशोधन होणे महत्त्वाचे - अध्यक्ष आदिनाथ सांगवे




लातूर :- संपूर्ण विश्वामध्ये आयुर्वेदाचे फार महत्व आहे. प्रत्येक वनस्पतीमध्ये मानवी शरीरातील विविध आजारावर खात्रीने उपचार करून आपले आरोग्य सुदृढ आणि निरोगी करण्याची प्रचंड शक्ती वनस्पतीमध्ये दडलेली आहे, त्यामुळे दुर्मिळ वनस्पतींचा विकास आणि संशोधन होणे महत्त्वाचे असल्याचे प्रतिपादन श्री महात्मा बसवेश्वर शिक्षण संस्थेचे अध्यक्ष श्री. आदिनाथ सांगवे यांनी केले. श्री महात्मा बसवेश्वर शिक्षण संस्था, लातूर द्वारा संचालित महात्मा बसवेश्वर महाविद्यालयातील वनस्पतीशास्त्र विभागाच्यावतीने भारतीय स्वातंत्र्याच्या ७८व्या वर्धापन दिनानिमित्त ७८ दुर्मिळ वनस्पतींचे भव्य प्रदर्शन महाविद्यालयाच्या विद्यार्थी अभ्यासिकेत आयोजित करण्यात आले होते यावेळी ते अध्यक्षीय समारोप करताना बोलत होते. यावेळी विचारमंचावर प्रमुख अतिथी संस्थेचे संचालक श्री राजेश्वर बुके, प्रभारी प्राचार्य डॉ. संजय गवई, सुप्रसिद्ध वैद्य रघुनाथ दत्तोबा अवधूत, आयुर्वेदाचार्य ज्ञानेश्वर आर्य, उपप्राचार्य प्रा. संजय पवार, उपप्राचार्य प्रा. बालाजी जाधव, पर्यवेक्षक प्रा. शिवशरण हावळे, विज्ञान शाखा समन्वयक डॉ. सिद्राम डोंगरगे, वनस्पतीशास्त्र विभागप्रमुख डॉ. दीपक चाटे यांची प्रमुख उपस्थिती होती.

पुढे बोलताना अदिनाथ सांगवे म्हणाले की, आपले चिरतारुण्य टिकवून ठेवण्याचे सामर्थ्य भारतीय औषधी वनस्पतीमध्ये आहे. प्राचीन निपुण वैद्यकशास्त्र व पारंगत तज्ञ चरक यांनी चरक संहितेमध्ये प्रत्येक वनस्पतीचे कार्य आणि त्यांचे विविध गुणधर्म वर्णन करून या वनस्पतीचे महत्व सांगितल्याचे ते म्हणाले. यावेळी संचालक राजेश्वर बुके म्हणाले की, माझा ॲलोपॅथी औषधापेक्षा अधिक दृढ विश्वास आयुर्वेद उपचारावरच आहे. ॲलोपॅथीने उपचार करून आजार दुरुस्त होत नाहीत अश्यावेळी आयुर्वेद उपचार करून आरोग्यावर विजय प्राप्त करता येते असेही म्हणाले. यावेळी प्रभारी प्राचार्य डॉ. संजय गवई, रघुनाथ अवधूत, आयुर्वेदाचार्य ज्ञानेश्वर आर्य, डॉ. सिद्राम डोंगरगे यांनीही मार्गदर्शन केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. मनोज गायकवाड यांनी केले, प्रास्ताविक डॉ. दीपक चाटे यांनी केले आणि आभार कु. साक्षी चाटे हिने मानले. या प्रदर्शनाचा जवळपास एक हजार लातूर शहरातील नागरिक, शाळा, महाविद्यालयातील शिक्षक, प्राध्यापक, शिक्षकेतर कर्मचारी, विद्यार्थी आणि पालकानी लाभ घेतला. या कार्यक्रमाला महाविद्यालयातील कनिष्ठ, वरिष्ठ शिक्षक-शिक्षकेतर कर्मचारी, तासिका तत्त्वावरील सर्व शिक्षक, कार्यालयीन कर्मचारी, प्राध्यापक, विद्यार्थी आणि पालक उपस्थित होते या प्रदर्शनाच्या यशस्वीतेसाठी डॉ. मनोज गायकवाड, डॉ. उज्वला गायकवाड, प्रा. प्रतीक्षा मामडगे, डॉ. अभयकुमार धाराशिवे, डॉ. राहुल डोंबे, कार्यालय प्रमुख नामदेव बेंदरगे, दत्ता पांचाळ, महादेव कोरे, विरेश कोरे, आनंद खोपे, शुभम बिरादार यांनी परिश्रम घेतले.

# हि पृथ्वी छ. शिवाजी महाराज म. फुले, छ. शाहू महाराज, डॉ. आंबेडकर यांच्या विचारावर उभी आहे - उत्तम तरकसे






अहमदनगर / प्रतिनिधी :- अहिल्याबाई होळकर नगर ता. श्रीरामपूर येथील लोकमान्य टिळक वाचनालय आगाशे सभागृहात लोककला कलावंत साहित्यिक परिषद महाराष्ट्र राज्य या संस्थेच्या वतीने साहित्यरत्न डॉ. अण्णाभाऊ साठे यांच्या जयंती निमित्त राज्यस्तरीय काव्य संमेलन आयोजित कार्यक्रमात महाराष्ट्र राज्य शासनाचा डॉ बाबासाहेब आंबेडकर समाज भूषण पुरस्काराने सन्मानित ज्येष्ठ कवी साहित्यिक व विचारवंत मा. श्री उत्तमराव दासु तरकसे आसरडोहकर यांचा नुकताच प्रकाशित झालेला शाहीची नोंद या काव्यसंग्रह करिता व साहित्य क्षेत्रात केलेल्या उल्लेखनीय योगदानाबद्दल त्यांना साहित्यरत्न डॉ. अण्णाभाऊ साठे साहित्य भूषण पुरस्कार २०२४ चा पुरस्कार प्रदान करून त्यांचा सन्मान करण्यात आला

सदर कार्यक्रम दरम्यान उत्तम तरकसे यांनी आपले विचार मांडताना डॉ. अण्णाभाऊ साठे म्हणाले होते पृथ्वी शेषनागाच्या फण्यावर नाही तर श्रमिकांच्या श्रमावर उभी आहे परंतु मी म्हणतो पृथ्वी ही छ. शिवाजी महाराज शाहू फुले आंबेडकर यांच्या विचारावर उभी आहे असे मोलाचे विचार मांडत उपस्थितांना मार्गदर्शन केले संस्थेचे अध्यक्ष बाबासाहेब पवार व पदाधिकारी तसेच निवड समिती यांनी सदर पुरस्कारासाठी माझी निवड केल्याबद्दल आभार मानले कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून मा. डॉ. बाबुराव उपाध्ये (ज्येष्ठ साहित्यिक) उद्घाटक मा. किशोर निर्मल प्रमुख अतिथी म्हणून मा. प्रा. डॉ. अंबादास सकट (साहित्यिक) मा. बाबासाहेब सौदागर (चित्रपट गीतकार) मा. सायमन भास्कर (साहित्यिक) मा. लहानुदास खरात (समाजसेवक) असे प्रमुख पाहुणे विचार मंचावर उपस्थित होते.

सदर कार्यक्रमास उपस्थित रसिक कवीने भरभरून दात देऊन सर्व सभागृह अगदी फुलून गेला होता सर्व उपस्थित प्रमुख पाहुणे व रसिक प्रेक्षक जनाचे संस्थेचे अध्यक्ष बाबासाहेब पवार यांनी आभार मानून कार्यक्रमाची सांगता करण्यात आली

# लातूर जिल्ह्यातील प्रत्येक पोलिस ठाण्यात 'अंधश्रद्धा निर्मूलन कक्ष' स्थापन !

लातूर :- महाराष्ट्र नरबळी आणि इतर अमानुष अनिष्ठ व अघोरी प्रथा व जादुटोणा यांना प्रतिबंध घालण्याबाबतचा अधिनियम २०13 च्या प्रभावी अंमलबजावणीसाठी मा. पोलीस महासंचालक महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचे पत्रक जा.क्र. पोमसं/२४/३४/ अंधश्रध्दा विधेकयक ५७८/२०13 दि.१९/०८/२०२१ आन्वये प्रत्येक पोस्टेला जादुटोना प्रतिबंधक कक्ष स्थापण करण्याबाबत आदेशीत करण्यात आले आहे. त्याअनुशंगाने मा. पोलीस अधिक्षक सोमय मुंडे यांचे आदेशावरून अपर पोलीस अधिक्षक डॉ. अजय देवरे यांचे मार्गदर्शनाखाली अंध्दश्रध्दा निर्मुलन आणि जादुटोना अधिनियमाच्या प्रभावी अंमलबजाणीसाठी लातुर जिल्हयामध्ये पोस्टेनिहाय कक्ष स्थापण करण्यात आले आहेत. व त्याचे नोडल ऑफीसर म्हणुन पोलीस निरीक्षक स्थानिक गुन्हे शाखा, लातूर संजीवन मिरकले यांची नियुक्ती करण्यात आलेली आहे. तर पोलीस स्टेशन स्तरावर एक अधिकारी दोन पोलिस अंमलदार यांची नियुक्ती करण्यात आली असून जादूटोणाविरोधी कायदा अंतर्गत येणाऱ्या तक्रारी वर तात्काळ कार्यवाही करण्यात येणार आहेत.

# एस्सी -एसटी उपवर्गीकरण व क्रिमिलियरच्या विरोधात बसपासह सर्व आंबेडकरी पक्ष -संघटनाचा मोर्चा, लातूर बंदला प्रतिसाद




लातूर : अनुसूचित जाती आणि जमाती प्रवर्गात उपवर्ग निर्माण करून क्रिमिलियरची अट लागू करण्याच्या सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयविरुद्ध बहुजन समाज पार्टीच्यावतीने २१ ऑगस्ट रोजी भारत बंद ची हाक दिली होती. त्याचाच एक भाग म्हणून लातूर येथे बसपा तसेच समविचारी आंबेडकरी पक्ष, संघटनानी आज मोर्चा काढून लातूर शहरात बंद पुकारण्यात आला. या लातूर बंदला प्रतिसाद मिळाला. मोर्चाच्या शिष्टमंडळाने जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर घुगे यांना निषेधाचे निवेदन सादर केले. लातूर शहरातील डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौकातुन एस्सी, एसटी समाज, आंबेडकरी पक्ष, संघटनाच्या वतीने मोर्चा काढण्यात आला. या मोर्चात बसपा जिल्हाध्यक्ष सिद्धार्थ सूर्यवंशी यांच्या आवाहनानुसार सर्व आंबेडकरी पक्ष संघटनानी बंद मध्ये सहभाग नोंदवला. या निषेध मोर्चात बसपा जिल्हाध्यक्ष सिद्धार्थ सूर्यवंशी, आरपीआयचे नेते चंद्रकांत चिकटे, रिपब्लिकन सेनेचे प्रा युवराज धसवाडीकर, वंचित चे अध्यक्ष सचिन गायकवाड, ब्लू पँथरचे अध्यक्ष साधु गायकवाड, लष्करे ए भिमाचे रणधीर सुरवसे, बहुजन क्रांती संघटना अध्यक्ष बाबासाहेब कांबळे व्हीएस पँथरचे आनंद जाधव, विद्रोही ग्रुपचे ॲड. आतिश चिकटे, भीम आर्मीचे विनोद कोल्हे, अक्षय धावारे दलित सेनेचे दिलीप गायकवाड, माणुसकी प्रतिष्ठानचे रवी गायकवाड, भीमराज युवा संघटनेच्या विनय जाकते, युवा भीमसेनेचे शेखर कांबळे, भीमशक्तीचे मोहन माने, विकास दंडे उदय सोनवणे गौतम बनसोडे दीपक सावंत ईश्वर सोनवणे धीरज कांबळे असे अनेक आंबेडकर निषेध मोर्चा सहभाग नोंदवला

विलासराव देशमुख वैद्यकीय महाविद्यालय डॉक्टर आंबेडकर मेडिकल असोसिएशन (दामा) यांनी या मोर्चाला सक्रिय पाठिंबा जाहीर दिला.

# ओवाळीते भाऊराया !!कनकधारा चॅरीटेबल ट्रस्ट लातूर चा सुंदर उपक्रम







लातूर :- कनकधारा चॅरीटेबल ट्रस्ट लातूर च्या वतीने बी एस एफ कॅम्प चाकूर येथे रक्षाबंधन चा कार्यक्रम संपन्न झाला.* आज दि १९/०८/२०२४ सायं ५:०० वा श्रीमती प्रिती प्रशांत सोनकर अध्यक्षा कनकधारा चॅरीटेबलं ट्रस्ट लातूर व त्याच्या संपूर्ण टीम च्या वतीने बी एस एफ कॅम्प चाकूर येथे रक्षाबंधन राखी पौर्णिमा साजरी करण्यात आली. आपल्या भारता चे सैनिक जवान आपल्या स्वतः च्या जीवाची पर्वा न करता स्वतः चे घर दार सोडून आपल्या सर्व भारतीयां साठी अहोरात्र लढत असतात आपले रक्षण करत असतात. त्यांना आपल्या बहीणीची उणीव भासू नये, या प्रेमा पोटी आज चा पवित्र सन म्हणजे राखी पौर्णिमा इब्ब्कॅम्प येथे साजरी करण्यात आली. एका बहीण भावाचे पवित्र नाते, भावाचे आयुष्य वाढावे, त्यांची हेल्थ,तब्बेत चांगली राहावी म्हूणन एक स्नेह,प्रेम,आशीर्वाद म्हूणन त्यांना प्रेमा चा धागा म्हणजे राखी बांधण्यात आली. राखी पोर्णिमा साजरी करण्यात आली. आज सर्व च्या प्रत्येक जवान,फोजी बांधवा च्या डोळ्यात एक वेगळीच चमक होती. आज त्याचे प्रेम व आशीर्वाद आम्हाला मिळाले. आज देवाला मनापासून प्रार्थना त्यांना दीर्घायुष्य तसेच उत्तम स्वास्थ मिळो, हि भगवान शिव - शंकरा च्या चरणी मनापासून प्रार्थना. यां वेळी कनकधारा चॅरीटेबलं ट्रस्ट लातूर च्या अध्यक्षा श्रीमती प्रिती प्रशांत सोनकर उपाध्यक्ष डॉ प्रांजली आशिष मारकड, श्रीमती शिल्पा शर्मा ,श्रीमती लता कांबळे, कु वैष्णवी सोनकर, कु मयुरी सरवदे यांनी सर्व जवानांना औक्षण करून राख्या बांधल्या केला. त्या वेळी इब्ब्कॅम्प चाकूर चे सर्व अधिकारी वर्ग व संपूर्ण स्टाफ ह्या रक्षाबंधन प्रोग्राम ला उपस्थित होते.

# तहसीलदार उमरी यांनी ज्युस पाजवुन किशनदादा गायकवाड कुदळेकर यांचे लाक्षणिक उपोषण सोडले!



उमरी :- मौ. कुदळा ता. उमरी जि. नांदेड येथील किशनराव सटवाजी गायकवाड रास्त भाव दुकानदार कुदळा यांना गावातील जातीयवादी मराठा सुवर्ण जातीच्या २७ समाजकंटकांनी दुकानावर जाऊन मांगडग्या अशी जातीवाचक व आई बहीणीवर कमरेच्या खाली अश्लील शिवीगाळ करून जिवे ठार मारण्याची धमकी दिली होती. तेव्हा गायकवाड यांनी दि.२५/०७/२०२४ रोजी उमरी पोलिस ठाण्यात फिर्याद दाखल केल्या नंतर रामेश्वर ऊर्फ बाबु माधवराव जाधव पाटील व २७ साथीदारांवर ट्रॉसिटी खाली आणि ईतर विविध गुन्हे दाखल केले आहेत परंतु सदर आरोपीला अद्याप अटक केलेली नाही. त्यांना त्वरित अटक करावे या मागणीसाठी व श्रीमंत व धनदांडग्या राशन कार्ड धारकांच्या उत्पन्नाची जिल्हास्तरावरून चौकशी करून सदर राशन कार्ड शुभ्र राशन कार्डात वर्ग करून धान्य बंद करावे. कुटुंबातील मयत व्यक्तीचे नावे त्वरित वगळावे व धान्य बंद करावे. मी ई - पॉस मशिनद्वारे धान्य वाटप करण्यासाठी तयार आहे. त्यांचे राशन कार्ड दुसरीकडे न जोडता सदरील राशन कार्ड कुदळा येथेच कायम ठेवावे. इंदिरा गांधी वृद्धापकाळ निवृत्ती वेतन योजना व श्रावणबाळ योजनेतील श्रीमंत व धनदांडग्या बोगस लाभार्थ्यांची जिल्हास्तरावरून चौकशी करून अनुदान बंद करून अतापर्यंतच्या अनुदानाची रक्कम वसूल करावे. इत्यादी मागण्यांसाठी दि २१/०८/२०२४ रोजी सकाळी ठिक ११ पासून उमरी तहसील कार्यालया समोर उपोषणास बसले होते. परंतु मा. नायब तहसीलदार संजय सोळंकर यांनी उपोषण स्थळी भेट देऊन किशनराव गायकवाड यांना ज्युस पाजवुन त्यांचे उपोषण सोडले असून सदर मागण्या मान्य करण्याचे लेखी आश्वासन दिले आहे. यामुळे गायकवाड यांनी उपोषण सोडलेले आहे. गायकवाड यांची तब्येत ठिक नसल्याने ग्रामीण रुग्णालय उमरी येथील वैद्यकीय अधिकारी व डॉ. यांनी शुगर, बीपी तपासणी करण्यात आली आहे. सदरील उपोषण स्थळी आशाताई मेटकर, पुरवठा निरीक्षक राजेश वैराळे व शिपाई जहागीरदार ईत्यादी कर्मचारी उपस्थित होते. तर पोलिस निरीक्षक अंकुश माने उमरी यांनी पोलिस बंदोबस्त देऊन कायदा व सुव्यवस्था राखण्यासाठी लक्ष घातले आहे. तर उमरी तालुक्यातील अखिल भारतीय अण्णा भाऊ साठे विकास परिषदेचे बहुसंख्य कार्यकर्ते उपस्थित राहुन पाठिंबा दिला आहे अशी माहिती रविंद्र किशनराव गायकवाड कुदळेकर यांनी प्रसिद्धी पत्रकाद्वारे दिली आहे.

# 'नमो शेतकरी महासन्मान निधी'चा चौथा हप्ता मिळणार! राज्याकडून निधी वितरणास मंजुरी

पंतप्रधान शेतकरी सन्मान निधी योजनेचा केंद्र सरकारचा हप्ता शेतकऱ्यांच्या खात्यावर जमा झाला असून राज्य सरकारचा हप्ता जमा होण्याचे बाकी होता. केंद्र सरकारच्या पीएम किसान योजनेच्या पार्श्वभूमीवर राज्य सरकारने नमो शेतकरी महासन्मान निधी योजनेची घोषणा केली होती.

त्यानुसार शेतकऱ्यांना प्रतिवर्ष ६ हजार रूपयांचा निधी टप्प्याटप्प्याने वितरीत करण्यात येतो. त्यामुळे शेतकऱ्यांना प्रतिवर्षी १२ हजार रूपये मिळतात.

दरम्यान, 'नमो शेतकरी महासन्मान निधी'चा चौथा हप्ता शेतकऱ्यांना अजून मिळाला नव्हता. पण राज्य सरकारने हप्ता वाटपासाठी निधी उपलब्ध करून दिला आहे. चौथ्या हप्त्यासाठी राज्य सरकारने २ हजार ४१ कोटींचा निधी वितरीत करण्यास राज्य सरकारने मान्यता दिली आहे. त्यामुळे पात्र शेतकर्यांना नमो शेतकरी महासन्मान निधीचा चौथा हप्ता येणाऱ्या दोन दिवसांत मिळण्याची शक्यता आहे.

'नमो शेतकरी महासन्मान निधी'च्या अंतर्गत राज्य सरकारने आत्तापर्यंत ५ हजार ५९२ कोटी रूपयांचा निधी वितरीत केला आहे. यामध्ये प्रत्येक शेतकऱ्यांना ६ हजार रूपये खात्यामध्ये वर्ग करण्यात आले आहेत. तर चौथ्या हप्त्यासाठी राज्य सरकारने २ हजार ४१ कोटी २५ लाख निधी आणि प्रशासकीय खर्चासाठी २० कोटी ४१ लाख एवढा निधी वितरित करण्यास मान्यता दिली आहे.

कधी मिळणार हप्ता?

राज्य सरकारने या हप्त्याच्या वितरणासाठी मंजुरी दिली असून आता निधी उपलब्ध झाला आहे. केंद्र सरकारच्या पीएम किसान योजनेच्या पार्श्वभूमीवर शेतकऱ्यांचा डाटा राज्य सरकारकडे असल्यामुळे येणाऱ्या दोन दिवसांत हप्ता शेतकऱ्यांच्या खात्यात वर्ग होण्याची शक्यता आहे.

PRINTED BY MAHESH MOTIRAM RATHOD, OWNED, PUBLISHED & EDITED BY ASHOK NAMDEVRAO HANWATE, PRINTED AT MAYUR PRINTERS, PLOT No. B-28, MIDC, NEAR BUS STAND 03, LATUR, Tq. & DIST. LATUR - 413512 (M.S.) PULISHED AT : KHADAK HANUMAN, MILIND NAGAR, LATUR TQ. & DIST. LATUR - 413512 (M.S.) EDITOR : ASHOK NAMDEVRAO HANWATE